## नि. ३४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी कोर्ट कमिशन नेमणुकीकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादी यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमण काढुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीचे गट नं. २०३/१ ते २०३/६ या मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. सदर मिळकतींची सरकारी मोजणी क्र. ७५९०/२०१६ यापुर्वी झालेली असुन त्याचा नकाशा देखील तयार झालेला आहे. त्याकामी प्रतिवादींनी सुमारे ७६.३९ आर इतके अतिक्रमण केल्याचे निष्कर्षित झालेले आहे. सदर अतिक्रमण वादींनी प्रतिवादीकडुन काढुन मागितले असता त्यास प्रतिवादींनी नकार दिल्याने वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द अतिक्रमण काढुन मिळण्याकामी दाखल केला आहे. सदर मोजणी ज्या मोजणीदाराने दावा मिळकतीवर जावुन केली ते सध्या मयत आहेत. त्यामुळे झालेली मोजणी व अतिक्रमण शाबित करणे प्रतिवादींना अडचणीचे झालेले आहे. त्याकारणास्तव वादी यांचे दावा मिळकतींचे पुन्हा शासकीय मोजणी होणे गरजेचे व आवश्यक आहे. दावा मिळकतीची मोजणी झाल्याशिवाय प्रतिवादींनी दावा मिळकतीत अतिक्रमण केले किंवा कसे हे स्पष्ट होणान नाही. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल करुन तालुका भुमी अभिलेख दौंड यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक होवुन दावा मिळकत गट नं. २०३/१ ते २०३/६ ची मोजणी होवुन त्याचा अहवाल न्यायालयात दाखल होण्याबाबत आदेश होण्याकरीता विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास नि. ३५ वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल करुन पुरावा निर्माण करत आहेत. वादी हे निव्वळ गट नं. २०३ व त्याचे पोटहिश्शे मोजणी करुन मागत आहेत. त्यामुळे स्पष्ट मोजणी अहवाल न्यायालयासमोर येणार नाही. वादी यांचे गट नं. २०३ चा मुळ सर्वे नंबर व त्यामध्ये झालेले सर्व गटांची मोजणी होणे गरजेचे आहे. तसेच सदर गट नं. २०३ चे लगतचे सर्व गटांची मोजणी देखील करणे गरजेचे आहे. तशी मागणी वादींनी त्यांचे अर्जामध्ये केली नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आलेली आहे. तसेच प्रतिवादींनी वैकल्पीकरित्या मागणी करताना जर वादी यांना अर्ज मंजुर करावयाचा असल्यास गट नं. २०३ चा मुळ सर्वे तसेच त्याचे झालेले सर्व गट नंबर व लगतचे सर्व गटांची

मोजणी होवुन तसा अहवाल न्यायालयात दाखल होण्याबाबतची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आलेली आहे.

०४. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहीले. वादी यांचे युक्तिवादाप्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांचे दावा मिळकतीमध्ये ७६.३९ आर इतके क्षेत्रामध्ये अतिक्रमण केलेले आहे. परंतू, वादी यांचे दाव्याचे अवलोकन केले असता वादी यांचे कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे पुर्वीचे गट नंबर हा २२० अ असा होता तसेच वादी यांनी अभिलेखावर नि. ०३ अुन.क्र. ०१ वर दाखल केलेल्या मोजणी क्रमांक ७५९०/२०१६ चे अवलोकन केले असता सदर नकाशा हा सदर मोजणी कामातील क प्रत असल्याबाबत कोठेही नमुद नाही. तसेच सदर नकाशामध्ये गट नं. २०३ चाच उल्लेख असल्याचे दिसुन येत आहे. वादी यांनी त्यांच्या दाव्यामध्ये कथन केल्याप्रमाणे बेटवाडी हे स्वतंत्र महसूल गाव असुन त्या जमीनीचा पुर्वीचा गट नं. २२० अ असा होता. वाडी विभाजनानंतर जुना गट नं. २२० अ चा नविन बेटवाडी गट क्रमांक २०३ झाला व त्याचे एकुण ६ पोटहिश्शे झाले. प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. १ ते ८ हे दावा गट नं. २०३/१ ते २०३/६ चे मालक आहेत. परंतू, सदर मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये गट नं. २०३/१ ते २०३/६ चे वर्णन नमुद नसल्याचे दिसुन येत आहे. तसेच सदर नकाशाचे कामी अतिक्रमित क्षेत्र हे अंदाजे ७६.३९ आर इतके असल्याचे दिसुन येत आहे. परंतू, सदर मोजणीचे कामी प्रतिवादी हे हजर होते अथवा कसे याबाबतचा कोणताही शेरा सदर मोजणी नकाशावर नमुद नसल्याचे दिसुन येत आहे. परंतू, वादी यांचे कथनाप्रमाणे सदर मोजणीचे कामी प्रतिवादी यांना नोटीस काढुन सदर मोजणी नकाशा तयार करण्यात आल्याचे नमुद आहे.

०५. यासर्व घटनाक्रमांचा विचार करता प्रतिवादी यांनी कथन केल्याप्रमाणे दावा मिळकतीचे नेमके वर्णन वादी यांनी अभिलेखावर आणले नसल्याचे दिसुन येत आहे. वादी यांनी त्यांचे अर्जात व दाव्यामध्ये नमुद केलेले मोजणी नकाशा क्रमांक ७५९०/२०१६ बाबतचा मजकूर हा नकाशात नमुद मजकुराशी विसंगत असल्याचे देखील दिसुन येत आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे पश्चिम बाजुने ७६.३९ आर इतके अतिक्रमण केले आहे. परंतू, सदर मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता दावा मिळकतीचे पश्चिम बाजुस प्रतिवादी यांचे गट नं. १५६, १५७, १५८ व १५९ असल्याचे कुठेही नमुद नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे प्रतिवादी म्हणतात त्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी निव्वळ पुरावा निर्माण करण्याचे दृष्टीकोनातुन दिला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तसेच सदरचा अर्ज मंजुर होण्याकरीता सबळ कारण व पुरावा देखील वादी यांनी अभिलेखावर व

अर्जाचे कामी दिला नसल्याचे दिसुन येत आहे. सदरची विनंती पाहता ती मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. या सर्व कारणांचा व वर नमुद विवेचनाचा एकत्रीत विचार करता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल करुन प्रस्तुतकामी मोजणी करीता कोर्ट कमिशन यांची नेमणुक करणे गरजेचे असल्याबाबतचा कोणताही प्राथमिक पुरावा अभिलेखावर सादर केला नसल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे न्यायाचे कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होणे गरजेचे असल्याचे स्पष्ट होत आहे. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

वादीचा नि. ३४ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

GAJANAN AJAY KULKARNI

Digitally signed by GAJANAN AJAY KULKARNI
Date: 2023.09.01 12:34:01 +0530

ठिकाण – दौंड
दि. ०१/०९/२०२३

(जी.ए.कुलकर्णी)
४ थे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर दौंड
ता.दौंड, जि. पुणे

# <u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | ए.एस. मुंढे |
| न्यायालयाचे नांव | :: | जी.ए.कुलकर्णी<br>४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ५, दौंड, ता. दौंड, जि. पुणे |
| निकाल दिनांक | :: | ०१/०९/२०२३ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | ०१/०९/२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | ०२/०९/२०२३ |